# प्रकरण आठवे

# उपसंहार

# प्रकरण ८ वे

# उपसंहार.

दलित साहित्यातील अन्य वाङ्मय प्रकाराच्या दृष्टीने विचारकरता ही आत्मकथने बऱ्याच उशीरा लिहिली गेली. त्यातून समाजवास्तूच्या पायाखाली दबलेल्या भीषण जीवनाचे दर्शन समाजासमोर आले. आपल्या जातीलाच काय हे पोट पाटीला बांधून हिंडावे लागते. आपल्या जातीवरच हा गुन्हेगारीचा शिक्का का बसला ? आपल्या जातीकडे पाहण्याचा इतर समाजाचा दृष्टीकोन केव्हा बदलणार ? आपल्या समाजाचे मूल्यमापन करणारी जी मूल्ये आहेत ती आता काळानुरुप बदलायला हवीत. आपण शिकले पाहिजे ही शिकवण समाजाला देण्यासाठी हे लेखन झालेले आहे. यातून दलितांच्या व्यथा-वेदना, दु:ख-आक्रोश यांची स्पंदने शब्दांकित झाली आहेत. या स्पंदनातून निर्माण झालेली साहित्य संपदा म्हणजे या लेखकाचे आत्मकथने होय.

एखादे साहित्यरुप जेव्हा वाङ्मयाच्या दालनात वाचकाचे लक्ष वेधून घेते तेव्हा त्यामागे विशिष्ट भूमिका आणि प्रभावी प्रेरणाशक्ती असते. याप्रमाणेच भटक्या पाठीला पोट बांधून गावोगाव जाणाऱ्या बऱ्याच वेळा काही कारण नसताना गुन्हेगारीचा शिक्का माथ्यावर बसल्यामुळे उध्दवस्त आयुष्य जगणाऱ्या समाजपरंपरेने व इतर समाजाने नको ते आरोप लाऊन दूर ठेवलेले आहे. अशा या दूर केलेल्या आणि राहिलेल्या समाजाची वेदना दु:ख आक्रोश समजासमोर मांडावा हीच भूमिका या लेखनामागे आहे. म्हणूनच गबाळकार म्हणतात ''माझ्या गबाळ या आत्मकथनात मी आजपर्यंत अनुभवलेले, पाहिलेले आणि आजदेखील जगतो आहे, उपभोगतो आहे. त्याचं वास्तव चित्रण केलेले आहे. या पुस्तकातील प्रत्येक पात्र आज सत्य परिस्थितीला तोंड देत आहे. समाजातील एक घटक की, ज्याला स्वत:चे असे अस्तित्व नाही अशा घटकाचे म्हणजे कुडमुडे जोशी जातीचे जीवन विस्तारित स्वरुपात वर्णन केलेले आहे.''[१] उचल्याकार लक्ष्मण गायकवाड यांची ही भूमिका अशीच आहे. त्यांनाही आपल्या समाजावर परंपरेने मारलेला गुन्हेगारीचा शिक्का पुसून टाकायचा आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर कोणत्याही जातीला गुन्हेगार समजू नये असे पंडित नेहरुनी सांगून सुध्दा पोलिस व शासन या जमातीची सुधारणा करण्याऐवजी लहान मुलावर खोटे नाटे आरोप लावून जन्मत:च त्याला गुन्हेगार बनवितात हे अयोग्य आहे. या समाजात लाखो रुपये भ्रष्टाचार करणाऱ्याला प्रतिष्ठा आणि मान्यता मिळते. पण पोटासाठी दहा - वीस रुपये चारणाऱ्याला मात्र जन्मभर गुन्हेगार रहावे लागते. या सर्व व्यथांना समाजासमोर आणण्यासाठी हे लेखन झालेले आहे.

या आत्मकथनाच्या संदर्भात आजपर्यंतच्या मराठी साहित्यातील दलित साहित्याच्या लेखनाचा विचार करताना सर्वप्रथम नाट्य, कविता, कथा, आत्मचरित्रे, आत्मकथने आणि समीक्षा या अंगाने दलित साहित्य आकार घेताना दिसते. विशेषत: कविता, कथा, आत्मकथन या वाङ्मय प्रकारातून दलित साहित्य आज अवतरते आहे. या सर्व लेखक मंडळीत महार जातीची लेखक मंडळी पुढे आहेत. अर्थात प्रत्येक लेखक या निर्मितीच्या पुढे जाऊन लेखन करताना दिसत नाही किंवा इतर वाङ्मय प्रकार हताळताना दिसत नाहीत. या निर्मितीनंतर काही मंडळींनी राजकारणात प्रवेश केला आहे तरीही या साहित्याचे पूर्व रुप पाहताना वेगवगळे रंग आपआपले रुप घेऊन पुढे येताना दिसतात. त्यातच शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, दया पवार, केशव मेश्राम, नामदेव ढसाळ ही मंडळी आदर्शाकडे झुकताना दिसतात. याचवेळी रा. ग. जाधवासारखे संमजस समीक्षक पुढे आले ही भवितव्याच्या दृष्टीने कौतुकास्पद गोष्ट आहे.

या सर्वांनी आत्मकथनाचा फॉर्म निवडला कारण तोच त्यांना योग्य वाटला. आपल्या वेदना योग्य रीतीने समाजासमोर मांडत असताना याच फॉमची गरज त्यांना वाटली. याचवेळी त्यांच्या लेखनाला आत्मचरित्र म्हणायचे का ? आत्मकथनच का म्हणायचे ? आत्मचरित्र आणि आत्मकथन यात काही सीमारेषा आहेत का ? असे प्रश्न निर्माण झाले पण आधुनिक मराठीतील आत्मचरित्राला दीड - दोन शतकांची परंपरा आहे त्या मानाने आत्मकथनाचे आयुष्य फार कमी आहे. तरीही दलित मंडीळींनी आत्मकथने लिहिली कारण आत्मचरित्रेही आयुष्याच्या मावळतीला लिहिली जातात. सर्व घटनांकडे तटस्थतेने पाहण्याचा तो एक प्रयत्न असतो. पूर्व स्मृतीत हरवून जायचे असते. आयुष्याची संध्याकाळ होत असताना बालपणाचे सोनेरी किरण, उगवतीचे सौंदर्य प्रौढ पणातले कर्तृत्व तपशीलवारपणे मांडायचे असते.

या उलट आत्मकथनकार इतिहासाच्या पार्श्वभूमीवर वर्तमानाशी संवाद करीत असतो. वर्तमान घटना सांगत असताना भविष्य काळाची भाषिते तो सांगतो त्यावेळी भविष्याचा प्रवास त्याच्या पुढ्यात असतो. तेव्हा त्याचे नाते अस्वस्थतेची, गतिमानतेशी असते. बहुतांशी आत्मकथनकार हे नाकारलेल्या समाजाचे प्रतिनिधी आहेत. वेगवेगळ्या अस्पृश्य जातीतून ते आले आहेत. म्हणूनच आपल्या जीवनाची वाटचाल करताना, आपण सोसलेल्या व्यथा वेदना साकार करुन भविष्यकाळाकडे जी वाटचाल असते ती सुकर करण्याचा प्रयत्न असतो. म्हणूनच विसंवाद, विषमतेचे चटके, लादलेली गुलामी, अन्याय, जुलूम या विरुध्द तीव्र प्रतिक्रिया त्यांच्या लेखनातून येताना दिसते. या लेखनामागे डॉ. आंबेडकर, बुध्द, कार्ल मार्क्स, म. फुले, वि. रा. शिंदे, भाऊराव पाटील व समतेचा उद्घोष करणारे सर्व वारकरी संतांची प्रेरणा यापाठीमागे आहे.

''गबाळ'' या आत्मकथनातील प्रेरणांचा विचार करताना या समाजातील रुढी, परंपरा, अंधश्रध्दा यांना साकार करण्याचा लेखकाचा प्रयत्न असल्याचे दिसते. दादासाहेब मोरे यांच्या लेखनातील वेदना व विद्रोह अत्यंत शांत, समंजस, धीर-गंभीरपणे मांडला गेल्याचे दिसते. अत्यंत लहानपणीच मोठ्या जबाबदाऱ्या अंगावर पडल्यामुळे विचित्र जीवनानुभव घेतले गेल्यामुळे हा समंजसपणा त्यांच्या ठायी आला असल्याचे दिसते. त्यांच्या लेखनातील विद्रोहाचा अंगार फुलत नाही म्हणून त्यांचे लेखन शांत, समंजस, तडजोड स्वीकारीत पुढे जाणारे आहे.

उचल्याकार लक्ष्मण गायकवाड यांच्या लेखनातील वेदना, विद्रोहाचा विचार करताना आपणाला आपल्या समाजातील दु:खे, परंपरेने मारलेला गुन्हेगारीचा शिक्का पुसून टाकायचा आहे. प्रस्थापित समाजातील व्यक्तीमापन मूल्ये कशी चुकीची आहेत हे त्यांना दाखवून द्यायचे आहे. व काळानुसार मूल्ये बदलतात. प्रत्येक युगाचा एक युगधर्म असतो पण प्रस्थापित समाज ही मूल्ये बदलायला तयार नसल्यामुळे इतर समाजाला त्याचा त्रास होतो म्हणून हा लेखक बंडखोरीच्या मार्गाने पुढे येताना दिसतो. त्याचवेळी प्रस्थापिताशी दोन हात करण्याची त्याची तयारी दिसते. हे दोन हात करताना हात गेले तरी चालतील पण लढाई झालीच पाहिजे तेव्हा हे सर्व शांत होईल. ही समाजासाठी सर्वस्व पणाला लावण्याची लेखकाची वृत्ती दिसून येते व एका प्रामाणिक कार्यकर्त्याची तळमळही दिसून येते. या संदर्भात सुशिलकुमार शिंदे यांनी ''आमच्या भाषेतून आम्ही अस्मिता घेऊन पुढे येत आहोत. मात्र हे दु:ख मांडण्याचा प्रयत्न करताना यत्य परिस्थितीपासून दूर जाता उपयोगाचे नाही. विद्रोह देखील किती प्रमाणात घेतला पाहिजे याची जाण हवी. माझं यात किती प्रमाणात चित्रण करण्यात आलेले आहे अशा आशयानं दलित समाज आपल्या लेखकाकडे पाहात असतो याची जाण या आत्मकथनकारांनी लक्षात ठेवायला हवी''.[२] हा दिलेला इशारा समजून घेतलेला दिसतो.

या लेखनाने उपेक्षित अशा भटक्या जातीजमातीचे जीवन समाजासमोर आले, कारण बहुतांशी लेखक हे एका विशिष्ट जातीतील असल्याचे दिसते. परंतु या लेखकाने आपल्या जातीच्या व्यथा-वेदना शब्दबध्द करुन एका उपेक्षित समाज जीवनाला प्रकाशात आणलेले आहे. वर्षानुवर्ष हा समाज इतर समाजापासून दूर रहात असल्यामुळे आपली एक वेगळी भाषा त्याने बनवली आहे. इतर समाजापासून वेगळे असले तरी आपली एक संस्कृती रुढी परंपरा सामाजिक संकेत यांनी निर्माण केल्याचे दिसते. हे या लेखनाचे सौंदर्य आहे. या लेखनातील जीवन जाणीवांचा विचार करताना त्यातून सामाजिक जाणिवात आणि अस्तित्ववादी जाणीवात, मार्क्सवादी जाणीवात व्यक्त होताना दिसतात. अस्तित्ववादाबरोबरच परात्म भावाची

जाणीव आत्मभान जागृती स्वनिर्णयाची क्षमता व स्वत:च्या जीवनाला अर्थ प्राप्त करणे ही तत्वे या लेखनातून प्रत्ययाला येतात. मार्क्सवादी जाणिवाचे दर्शनही यातून घडते. आपण अर्थव्यवस्थेतील जाणीव त्यांना झालेली आहे. भूकेचा प्रश्न या समाजाचा मूलभूत प्रश्न असल्याने तो सोडवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या श्रमाचा योग्य मोबदला मिळावा ही अपेक्षा लेखक व्यक्त करताना दिसतात.

कोणत्याही वाङ्मयाचे सौंदर्य, कलात्मकता ही तेथे वापरलेल्या भाषेवर अवलंबून असते. ज्या गावात ते शिकले, वाढले, जगले त्या त्या परिसरातील बोलीचा वापर या लेखकाने केलेला आहे. त्यामुळे बोलीतील लय, खटके, शब्द सौंदर्य याचा प्रभाव या लेखनावर जाणवतो. जसजसे अनुभवाचे क्षेत्र विस्तारत जाईल तसतसे भाषाही बदलू लागल्याचे जाणवते. या पार्श्वभूमीवर ''दलित साहित्यातील भाषेचे सौंदर्य'' या लेखात रा. ग जाधव यांनी केलेले विवेचन उल्लेखनीय ठरते. ते लिहितात की, ''दलित साहित्यात येणाऱ्या शब्दांना एक सांस्कृतिक संदर्भ आहे. काही ठिकाणी हे शब्द आर्थिक आणि सामाजिक अर्थाने येतात. बारा बलुतेदार, वतनं, कैकाडी, लमाण जात, ढोर, लोहार, महार, चांभार, मांग इ. समाजाचे वर्णन त्यांच्या चालीरिती यातून त्यांची भाषा बनली आहे. बोलीतील शब्दांचे अर्थ तपासताना आपल्याला त्यांचा संदर्भ टाळता येणार नाही. पूर्वाश्रमीच्या महारांना ढोर उचलण्याचा, सांगावा द्यायचा इ. कामे करावी लागत. चांभाराच्या व्यवसायातून रापी, टाक्याला बुध सुचणं, आभाळाला भोक पाडण्याचा अनुभव, बिनसलेल्या खोडाचं उधळणं इ. वाक्यप्रचाराप्रमाणेच निरनिराळ्या उपमा, प्रतिमा या जीवनातून प्रकटतात. मुसळानं ढुंगण बडवून घेणं, फाटक्या वाहणेसारखी फटफटणं, मसन वाटा, खांजर माळ चितळाया, बोडकी, कोनाडा, गावबसवी, भवानी इ. शब्द व वाक्यप्रचार त्यांच्या जीवन व्यवहाराशी निगडित आहेत. लेखकाची मूळ भाषा त्याच्या सांस्कृतिकतेचे दर्शन घडविते.''[३] याप्रमाणेच गबाळमधील पाल साठवणे, कळवा घालणे, हाडप पंचाग, मारकांडी गासुकली किंवा उचल्यातील खिस्तंग मताया, संतामुचलर, तेलचीच्या ऊरावर सांडगा बसला या सारख्या वास्तवाभिमुख शैलीचा वापर केला असल्यामुळे ही आत्मकथने कादंबरी वाचनाचा आनंद देतात. या बरोबरच उस्मानाबाद, लातूर किंवा संपूर्ण मराठवाडा, सोलापूर, सांगली जिल्ह्यातील जत तालुक्याचा परिचय होतो.

या लेखनातून या समाजातील जातपंचायती त्यांच्या न्यायनिवाड्याच्या पध्दती, लग्न, बारसे, मर्तिकासारख्या विधीची ओळख होते. आपआपल्या जाती व्यवसायाची गुपिते या लेखकानी सांगितली आहेत. म्हणूनच या आत्मकथनांना सामाजिक दस्तऐवजाचे मूल्य प्राप्त झाले आहे. कोणत्याही कलाकृतीची

वाङ्मयीन गुणवत्ता ही आशयाच्या नाविन्याप्रमाणेच रचनेवरही असते. या अर्थाने या दोन्ही आत्मकथनांची रचना निवेदन पध्दती सहज, सोपी कादंबरीसादृष्य अशी आहे. त्यांची शीर्षकेही बोलकी असल्याचे दिसते.

या आत्मकथनावरबरेचदा तोच तो पणाचा आरोपकेला जातो पण या लेखनात तोच तो पणा स्वाभाविक आहे. कारण दलित जीवनाचा जो अंतपट आहे तो जवळजवळ सारखाच आहे. मानहानी, नरकप्राय वेदनांचे जीणे, आदि मानवालाही लाजवतील अशा रुढी परंपरा या समाजात असल्यामुळे याा लेखनातील आशयद्रव्यात सारखेपणा दिसतो.

दलित आत्मकथनाच्या भवितव्याचा विचार करता ते उज्वल आहे असेच दिसते. कारण आज कुडमुडे जोशी, उचल्या, पोतराज, गोंधळी, महार, मातंग या ओसाडीत राहणाऱ्या अनेक जाती जमाती शब्दांची किमया कळू लागल्यामुळे बोलू लागले आहेत. त्यांचे अनुभव शब्दरुप धारण करीत आहेत. मराठी साहित्य समृध्द करण्याच्या कार्यात या आत्मकथनाचा वाटा मोठा आहे. मात्र या आत्मकथनकारांनी काही गोष्टीचे भान ठेवावे ते म्हणजे आपआपल्या पोटजातीचे सवतेसुभे उभे न करता सर्व अस्पृश्य भटक्या जाती जमातीला आता दलित मानावे याप्रमाणेच या आत्मकथनाच्या यशानंतर यांची लेखणी, नवनिर्मिती बंद पडल्याचे दिसते. राजकारणात जागा मिळाल्यानंतर ही मंडळी समाजाला विसरतात असे होऊ नये तर, समाजाची बांधिलकी बाळगली पाहिजे आत्मकथनाच्या पुढे जाऊन काहीतरी आगळे-वेगळे, भव्य-दिव्य घडले पाहिजे.

या मर्यादा असल्या तरी भटक्या समाजातील या तरुणांनी लेखन केलेल्या लेखनाला एक सामाजिक व वाङ्मयीन मूल्य लाभलेले आहे. या आत्मकथनाच्या रुपाने मराठी साहित्याचे दालन अधिक समृध्द झालेले आहे.

# संदर्भ टीपा


१) ''गबाळ'' मनोगत - दादासाहेब मोरे, २५०, शनिवार पेठ, पुणे. प्र.आ. १९८३, पृ. २०१.

२) दलित साहित्य विशेषांक - सुशीलकुमार शिंदे, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, दिवाळी अंक, १९८७, पुणे पृ. ५५.

३) दलित साहित्यातील भाषेचे संदर्भ - रा. ग. जाधव, अस्मिता दर्श, जा. फे.मा. १९८२ पृ. ५८.